दै. पुण्यनगरी दि. 16/02/2024

# चोरीप्रकरणी आरोपी २४ तासांत जेरबंद

**नांदेड :** बसस्थानक परिसरात महिलांचे दागिने पळविण्याचे प्रकार वाढले होते. या पार्श्वभूमीवर वजिराबाद गुन्हे शोध पथकाने एका ५४ वर्षीय संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने ८ फेब्रुवारी रोजी एका महिलेची पर्स चोरल्याची कबुली दिली. त्याच्याकडून सुमारे ५८ हजार रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

शहरात ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी बसस्थानक परिसरातून एका महिलेची पर्स चोरीला गेली होती. पर्समध्ये सोन्याचे दोन मंगळसुत्र, सोन्याचे झुमके जोडी, व ४ हजार रुपये रोख असा एकुण १ लाख ४ हजारांचा ऐवज चोरट्याने पळविला होता. वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील सहा. पोलीस निरीक्षक शिवराज जमदडे, जमादार दत्तराम जाधव, मनोज परदेशी, पोलीस नायक विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावरे, पोकॉं शेख इमखरन, मेघराज पुरी, अंकुश पवार यांना गुन्ह्याचा उकल करण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले होते.

- गुन्हे शोध पथक स्थानक परिसरात तपास करत असताना प्रवाशांच्या गर्दीमध्ये एक इसम गर्दीतील महिलांच्या मागे खेटुन उभे राहतून तिच्या या ताब्यातील पर्स चापळत असतांना आढळुन आला. त्यास ताब्यात घेण्यात आले. त्याने प्रल्हाद खंडुजी पांचाळ (५४, रा.इंदिरानगर, बारड ) असे नाव सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या पॅन्टचे खिशात दोन



सोन्याचे झुमके व दोन मंगळसुत्र व मनी असलेली पोत आढळुन आले. पोलिसी खाक्या दाखविताच त्याने ८ फेब्रुवारी रोजी चोरी केल्याची कबुली दिली. यास १३ फेब्रुवारी रोजी तपासासाठी जमादार प्रदीप खानसोळे व पोकॉं प्रदीप कांबळे यांच्या ताब्यात दिले. त्यास न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

दै. नांदेड वार्ता

# उमरी येथे जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-उमरी येथील बसस्थानकाजवळ सुरु असलेल्या जुगार अड्डयावर बुधवारी दुपारी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकून पाच प्रतिष्टीतांना अटक केली आहे.

बसस्थानका परिसरातील महादेव मंदिरा जवळ गेल्या अनेक दिवसांपासून जुगार अड्डा सुरु होता. बुधवारी दुपारी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे फौजदार आनंदा बिच्चेवार व पोलीस कर्मचाऱ्यांनी जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून झन्नामन्ना नावाचा जुगार खेळत असतांना बालाजी गणपत गंगासागरे रा.हनुमान गल्ली,उमरी, मारोती विठ्ठल सोनकांबळे रा.चिंचाळा ता.उमरी, अक्षय प्रविणकुमार अग्रवाल रा.बालाजी गल्ली उमरी, साईनाथ बाबुराव डुबुकवाड रा.रापतवारनगर उमरी, बालाजी शंकर सूर्यवंशी रा.रापतवारनगर उमरी या पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख १४ हजार रुपये पोलीसांनी जप्त केले.

फौजदार आनंदा बिच्चेवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उमरी पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.